निवडणूक तात्काळ

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१७/का-८
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
ई-मेल : sec.mh@gov.in
दिनांक: १५ सप्टेंबर २०१७

प्रति,
मा. प्रधान सचिव,
उद्योग, उर्जा व कामगार विभाग- (उर्जा),
महाराष्ट्र शासन.

विषय :- ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुका- २०१७
... निवडणूक काळात संबंधित ठिकाणी विनाव्यत्यय विद्युत पुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत.

संदर्भ :- आयोगाचे समक्रमांकाचे दि.२१ ऑगस्ट २०१७, दि.०१ व १२ सप्टेंबर २०१७ रोजीचे निवडणूक कार्यक्रमासंबंधातील आदेश.

आदरणीय महोदय,

राज्य निवडणूक आयोगाकडून उक्त संदर्भीय आदेशांद्वारे नुकताच राज्यातील सर्व जिल्ह्यांत मुदत संपणाऱ्या सुमारे ८,००० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. (प्रती संलग्न)

२. ग्रामपंचायत निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात विहित मुदतीत पार पाडणे हे आयोगाचे सांविधानिक दायित्व आहे. याद्दष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना आयोगाकडून करण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हूणन ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्ये नामनिर्देशनाच्या प्रक्रियेसह सर्व टप्प्यांचे संगणकीकरण करण्यात आले असून दुर्गम भागात राहणारा उमेदवारही ग्रामपंचायतींच्या सरपंच/सदस्य पदाच्या थेट निवडणुकीसाठी संगणकामार्फत आपला उमेदवारी अर्ज भरू शकणार आहे. त्याचप्रमाणे यापश्चात नामनिर्देशनपत्राची छाननी, मतदान व मतमोजणी इत्यादीं टप्प्यावरील अहवाल तहसिल कार्यालयाच्या स्तरावरून परस्पर राज्य निवडणूक

C:\Users\vinod.chavan\Desktop\प्रभाग रचना, निवडणूक, मतदार यादी २०१७-१८ फाईल\nov dec eln prog new Comm Dictt. Revise.docx

आयोगाकडे सादर केले जाणार आहेत. या सर्व बाबी लक्षात घेता निवडणुकीचे कामकाज विनाव्यत्यय विहित मुदतीत पूर्ण होण्याच्यादृष्टीने संबंधित ठिकाणी अखंड विद्युत पुरवठा उपलब्ध असणे अत्यंत निकडीचे आहे.

३. यासंबंधात मा. आयुक्त यांनी दि.१३ व दि.१४ सप्टेंबर २०१७ रोजीच्या दौऱ्यात नांदेड, अकोला व वाशीम या जिल्ह्यांत सुरू असलेल्या ग्रामपंचायत निवडणूक कार्यक्रमाचा आढावा घेतला असता, तहसिल तसेच गाव पातळीवर विद्युत पुरवठा वारंवार खंडीत होत असल्यामुळे निवडणुकीचे टप्पे विहित कालमर्यादेत पार पाडण्यात स्थानिक प्रशासनाला अडचणीचे ठरत आहे.

४. **सबब, यादृष्टीने आपण स्थानिक पातळीवरील महावितरण संस्थेच्या अधिकाऱ्यांना संबंधित ठिकाणी निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंतच्या कालावधीसाठी अखंडीत विद्युत पुरवठा उपलब्ध करून देण्यासंदर्भात त्वरीत उचित निर्देश द्यावेत, ही विनंती.**

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(शेखर चन्ने)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी:

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. जिल्हाधिकारी (सर्व संबंधित) आपल्या जिल्ह्यात निवडणूक होणाऱ्या ग्रामपंचायतींची यादी महावितरण संस्थेच्या संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावी.